# १२ . विवाह ( सप्तमस्थान )

विवाह ही सामाजिक बंधनाची व मान्यतेची आणि धार्मिक क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेली महत्वाची घटना असल्यामुळे ‘ गुरू ’ ह्या ग्रहाचे अंमलाखाली मानण्यात येते . स्त्रीचे कुंडलीमध्ये पतिकारक ग्रह ‘ मंगळ ’ व पुरूषाच्या पत्रिकेमध्ये पत्नीसुखाचा दाता ‘ शुक्र ’ मानला आहे . तसेच सप्तमेश व सप्तमातील ग्रहही विवाहावर आपला प्रभाव दाखवितात . ह्या सर्व ग्रहांची अवस्था , भावगत फले , योग , दृष्टी , महादशा व अंतर्दशा , नवमांश आणि ग्रहांची गोचर भ्रमणे ह्यांचा पूर्ण अभ्यास केल्यानंतरच विवाहासंबंधी मत देणे शक्य असते .

विवाहयोगाचा अभ्यास खालील उपप्रकारांमध्ये विभागून केल्यास ते अधिक सोयीचे होईल .

- सर्वसामान्य रूढिबद्ध विवाह
- खडतर विवाह योग
- प्रीति विवाह
- प्रेमभंग
- रूढिबाह्य विवाह
- वैधव्ययोग / विधुरावस्था
- अहेव मरण
- दुःखपूर्ण विवाह
- घटस्फोट
- परित्यक्ता
- द्विभार्यायोग

सप्तमस्थानासंबंधित ( लग्न , पति , पत्नी ) काही महत्वाचे योग ह्या प्रकरणाशेवटी दिले आहेत .

<u>सर्वसामान्य रूढिबद्ध विवाह पुढील योगांवर होण्याची शक्यता अधिक असते ः</u>

१ . सप्तमस्थानामधून गुरूचे भ्रमण , द्वितीय , अष्टम व व्ययस्थानी चंद्र नसल्यास .




⊗ ह्या स्थानी चंद्र नको .

२ . चंद्रापासून गोचर ‘ गुरू ’ सातवा परंतु त्रिकस्थानी म्हणजेच ६ . ८ . १२ ह्या स्थानी नसावा .

३ . गुरूचे गोचर भ्रमण मंगळावरून ( स्त्रीच्या पत्रिकेत) व शुक्रावरून ( पुरूषाच्या पत्रिकेत ) होत असेल तर विवाहाची शक्यता असते .

४ . विवाहयोग्य काळामध्ये शुक्र अगर गुरूची महादशा असून , गुरूची किंवा सप्तमेशाची अंतर्दशा असेल तर विवाह होऊ शकतो .

५ . गोचरीचे गुरूभ्रमण लग्न , तृतीय किंवा लाभस्थानातून होत असल्यास , ( गुरूची सप्तमावर पूर्ण दृष्टी असल्यामुळे) विवाह होऊ शकतो . ( गुरूची दृष्टी ५ , ७ , ९ )




६ . जन्मकालीन शुक्राच्या ९ किंवा ५ व्या स्थानी गोचरीचा गुरू असता विवाहयोग संभवतो .

७ . सप्तमांश कुंडलीतील शुक्र , गोचर शुक्राशी केंद्र किंवा नवपंचम योग करतो तेव्हा विवाह होतो . त्याच काळात शुक्रदशा किंवा अंतर्दशा असल्यास नक्की .

## <u>खडतर विवाह योग ः</u>

१ . सप्तमेश त्रिकस्थानी म्हणजेच ६ , ८ , १२ ह्या स्थानी . शनि हा मंदग्रह सप्तमेश असून व्ययामध्ये असेल तर हे फल प्रकर्षाने जाणवते .

⊗ सप्तमेश



२ . शनि लग्नी , पंचमात , दशमात किंवा सप्तमात असता विवाहयोग उशिरा संभवतो कारण शनिची ३ , ७ , १० दृष्टी सप्तमावर असते .




३ . विवाहाचा कारक गुरू ' शनि ' ह्या मंदगती पापग्रहाबरोबर युती योगात असताना . ( कोणत्याही स्थानी )

४ . सप्तमेशाबरोबर शनि युतीयोगात असताना .

५ . सप्तमेश कोणत्याही स्थानी असून त्यावर शनिची ३ , ७ , १० वी दृष्टी असल्यास .

६ . सप्तमस्थानी स्वक्षेत्रीचा अगर उच्चीचा सोडून अन्य राशीमध्ये गुरू असल्यास , म्हणजेच सप्तमस्थानी कर्क (४) धनु (९) मीन (१२) ह्या राशी वगळता दुस-या राशीतील गुरू .




 रास ४ , ९ , १२ सोडून

७ . कोणत्याही स्थानी मकरेचा गुरू .

८ . विवाहयोग्यकाली शनिची मारक महादशा असणे .

## प्रीतिविवाहाचे योग ः

१ . सप्तमेश पंचमात व पंचमेश सप्तमात .

२ . पंचम व सप्तमस्थानांचे अधिपति शुभग्रह असतील आणि त्या उभयतांची परस्परांवर दृष्टी असेल अगर एकाची दुस-यावर दृष्टी असेल तर प्रेमविवाहाचा योग संभवतो .

३ . पंचमस्थानातील वृषभेचा शुक्र कोणत्याही अशुभ योगांवाचून किंवा दृष्टीवाचून असेल तर .




४ . विवाहयोग्य वयात शुक्राची महादशा व शुक्र व गुरू यांचा शुभयोग असल्यास .

५ . पंचम व सप्तमस्थानचे योग शुक्र , चंद्राचे असून विवाहयोग्यकाली त्यापैकी एकाची महादशा असल्यास .

## प्रेमभंगाचे योग ः

१ . शुक्र व शनिची युती कोणत्याही स्थानी .

२ . पंचमस्थानी कोणताही पापग्रह उदा . राहू , केतू , नेपच्यून .

३ . पंचमेश त्रिकस्थानी म्हणजेच ५ . ८ . १२ ह्या स्थानी .

४. सप्तमेश त्रिकस्थानी परंतु पंचमेशाबरोबर युतीत नसल्यास.

५. पंचमेशाची पापग्रहाशी युती.

६. पंचमावर पापग्रहाची द्दष्टी.

७. पंचमात जलराशीतील चंद्र म्हणजेच कर्क (४) वृश्चिक (८) किंवा मीनेचा (१२) चंद्र पंचमात.

८. पंचमस्थानी शुक्र युतीयोगात, हर्षल, मंगळ किंवा राहूबरोबर असल्यास. विशेषत्वाने वृश्चिक राशीत.

९. पंचमस्थानात एकटा हर्षल विशेषतः अग्निराशीत म्हणजेच मेष (१) सिंह (५) धनु (९) राशीतील हर्षल.

१०. पंचमात एकटा अतिअशुभ चंद्र असल्यास प्रेमप्रकरणात दारूण निराशा होऊन दुसरा विवाह झाला तरी प्रेम विसरता येत नाही.

<u>रूढिबाह्य विवाह (प्रचलित धर्ममान्य पद्धतीबाहेरील विवाह):</u>

१. सप्तमेशाबरोबर युतीमध्ये राहू किंवा केतू असल्यास, आंतरजातीय विवाह संभवतो.

२. सप्तमस्थानी जलराशीतील युवा नेपच्यून म्हणजेच सप्तमस्थानी कर्क (४) वृश्चिक (८) मीन (१२) रास असून नेपच्यून १२° - १८° अंशी असल्यास.

३. सप्तमेशाबरोबर जलराशीतील युवा नेपच्यूनची युती.

४. गुरू - हर्षल अगर शुक्र - हर्षल यांची अंशात्मक युती पत्रिकेत कोणत्याही स्थानी असता.

५. सप्तमामध्ये अग्निराशीतील युवा हर्षल म्हणजेच सप्तमस्थानी मेष (१) सिंह (५) धनु (९) रास असून हर्षल १२° - १८° अंशी असल्यास.

<u>वैधव्ययोग / विधुरावस्था:</u>

१. सप्तमस्थानी पापग्रह असून सप्तमेश अष्टमात असल्यास वैवाहिक भागीदाराचा मृत्यू स्वतः आधी संभवतो.

२. सप्तमस्थानामध्ये एकटा राहू नीच क्षेत्रीचा. म्हणजेच धनु (९) अगर मीनेचा (१२) राहू सप्तमात.

३. मंगळ व राहू यांची अंशात्मक युती. ही शक्यता अग्निराशीमध्ये म्हणजेच १. ५. ९ राशीत अधिक असते.

४. मंगळाचा केंद्र (९०°) अगर षडाष्टक योग (१५०°) राहूबरोबर सप्तमस्थानी.

५. गुरू व राहूची युति असून विवाहोत्तर काळामध्ये राहू महादशा असून गोचर भ्रमणे विशेषकरून प्रतिकूल असल्यास.

६. द्वितीयस्थानी १.५.९ राशीतील मंगळ, हर्षलाच्या कुयोगात असल्यास.

७. धनुराशीमध्ये ‘ मूळ ’ ह्या उग्रनक्षत्रामध्ये राहू मंगळाची युति सप्तमामध्ये असल्यास.

८. सप्तमेश द्वितीयामध्ये असून त्यावरून हर्षलाचे गोचरभ्रमण.

९. अशुभग्रहाने युक्त मंगळ अष्टमात.

१०. सप्तमेश द्वितीयात असता.

टीप ः पत्नीकारक शुक्राच्या संदर्भामध्ये उपरोल्लेखित सर्व योग ( मंगळाऐवजी शुक्र) असता विधुरयोग संभवतो.

वरील सर्व योग भावचलित कुंडलीच्या आधारे ठरवावेत आणि महादशा , अंतर्दशा व गोचरभ्रमणे ह्यांचा विचार केल्यावाचून निर्णयात्मक विधान करू नये.

## अहेव मरण ः

१. सप्तमेश त्रिकस्थानी नसून सप्तमामध्ये स्वराशीचा अगर उच्चीचा गुरू असल्यास.

⊗ सप्तमेश ह्या स्थानी नको.




२. सप्तमावर गुरूची दृष्टी असल्यास ( गुरू कुयोगात नसावा ) म्हणजेच गुरू लग्नी , तृतीयेत किंवा लाभस्थानी असल्यास गुरूची ५ , ७ , ९ वी दृष्टी सप्तमावर असते.

३. सप्तमेश द्वितीयामध्ये नसावा कारण द्वितीय स्थान हे सप्तमाचे अष्टमस्थान होय.

४. अष्टमात शुभग्रहाबरोबर चंद्र असल्यास अकाली सौभाग्यमरण येते.

## दुःखपूर्ण विवाह ः

१. सप्तमस्थानी धनुराशी ( ९ ) सोडून अन्यराशीचा केतू असल्यास.

२. सप्तमेश अष्टमात.

३. सप्तमेश षष्टात असल्यास जोडीदार शत्रुवत वाटतो. सतत धुसफुस , चिडचिड चालू असून मनःशांति लाभत नाही.

४. पत्रिकेत गुरूबल नसल्यास आणि सप्तमेश ६. ८. १२ स्थानी असून सप्तमात पापग्रह असल्यास.

५. शुक्र अस्तगंत असून गुरूबल कमी असल्यास.

६. शुक्र शनिच्या राशीमध्ये असल्यास म्हणजेच मकरेचा (१० ) किंवा कुंभेचा (११ ) शुक्र.

घटस्फोट ः

१. सप्तमेश त्रिकस्थानी असून सप्तमात हर्षल अगर अशुभ राहू वा केतू असल्यास.

२. सप्तमेश हर्षलाचे युतीत असून सप्तमावर पापग्रहाची दृष्टी आणि विवाहसुखाला अनिष्ट महादशा असल्यास.

३. धनुराशीत रवि + चंद्र + शुक्र युती कोणत्याही स्थानी विशेषेकरून मूळ नक्षत्रामध्ये.

परित्यक्ता ः ( पतीपासून फारकत पण घटस्फोट नव्हे )

१. सप्तमेश व शनिची युति त्रिकस्थानी.

२. सप्तमावर पापग्रहाची दृष्टी व अनिष्ट महादशा असल्यास.

द्विभार्यायोग ः

१. सप्तमेश पापग्रहाच्या राशित व लग्नेश अष्टमात.

२. सप्तमस्थानी चंद्र + मंगळ युती असल्यास १९ वर्षापर्यंत विवाह करू नये कारण द्विभार्यायोग संभवतो.

३. सप्तमातील कर्क व मीन राशीतील मंगळ पापग्रहदूषित असल्यास.

४. सप्तमात शनि व १. २. ८. १२ ह्या स्थानी मंगळ.

लग्न , पति व पत्नी संबंधित योग व त्यांची फलिते ः

१. शुक्र आणि रवि सप्तमात , भाग्यात किंवा भाग्यात.
फलित ः जोडीदारास शारीरिक अपंगत्व संभवते.

२. सप्तमेश षष्टात शुक्राबरोबर
फलित ः जीवनसाथी वैवाहिक सुख देऊ शकत नाही ( Frigid) वा अपेक्षांमध्ये अतिशय फरक असतो.

३. सप्तमेश किंवा शुक्राबरोबर , गुरू किंवा बुध किंवा त्यांची दृष्टी.
फलित ः जीवनसाथी प्रामाणिक असतो.

४. लग्नेश व सप्तमेश यांची युति किंवा परस्परांवर दृष्टी.
फलित ः अधिक भार्यायोग.

५. दशमेश, द्वितीयेश व सप्तमेश दशमात
फलित : अनैतिक संबंध असू शकतात.

६. बलवान द्वितीयेश सप्तमेशाबरोबर किंवा दृष्टीत आणि लग्नेश व शुक्र बलवान.
फलित : पत्नी कडून पैसा मिळतो.

७. षष्टात मंगळ, सप्तमात राहू, अष्टमात शनि
फलित : साथीदाराचा अकाली मृत्यु संभवतो.

८. गोचरीचा शनि २. ४. ६. ८. १२ मध्ये असता विवाह होऊ शकतो.

९. जन्मकालीन शुक्राच्या ५ किंवा ९ व्या स्थानी गोचरीचा गुरू विवाहयोग देतो.

१०. शुक्र किंवा सप्तमेश १ ते ७ ह्या स्थानी असता वधू / वर जवळ राहणारे. ९ मध्ये असता परदेशचे.
८. १०. ११. १२ मध्ये असता दूरचे असतात.

११. सप्तमस्थानी विशेषतः स्त्रीच्या पत्रिकेत रवि + मंगळ युति हर्षलाच्या कुयोगात असता घटस्फोट संभवतो.

१२. सप्तमस्थानी राहूच्या कुयोगातील मंगळ वैधव्ययोग देतो.

१३. अष्टमातील स्त्री राशीचा मंगळ दिवसा कामवासना जागृत करतो.

१४. अष्टमात चंद्र मंगळ युती असता जबरदस्त विषय वासना असून म्हातारपणात सुद्धा व्यक्ति लघळपणा करतात.

१५. रवि द्वितीयात असता पत्नि अशक्त व आजारी असते.

१६. शनि द्वितीयात असता पत्नीस प्रथम मृत्यूयोग संभवतो.

१७. सप्तमामध्ये वृषभ किंवा तुळराशीत शुक्र, चंद्र, मंगळ युतीत असता अनेक ठिकाणी शरीरसंबंध संभवतो.

१८. मिथुन लग्नाच्या स्त्रिया ह्या ना त्या स्वरूपात जोडीदारास छळतात.